मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल



बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: 9834138482




# अनंत चतुर्दशीसाठी पिंपरी-चिंचवड महापालिका सज्ज!

## ४१ कृत्रिम तलावांसह वैद्यकीय पथके, रुग्णवाहिका, अग्निशमन जवान तैनात!

» पिंपरी | प्रतिनिधी

**गणेशोत्सवाची सांगता करणाऱ्या अनंत चतुर्दशीच्या पार्श्वभूमीवर पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाने विसर्जनाची तयारी पूर्ण केली आहे. नागरिकांची सुरक्षितता आणि विसर्जन प्रक्रिया सुरळीत पार पडावी, यासाठी विसर्जनस्थळी वैद्यकीय पथके, रुग्णवाहिका, प्रशिक्षित अग्निशमन जवान, आपदा मित्र, सर्पमित्र, प्राणीमित्र आणि जीवरक्षकांची तैनाती करण्यात आली आहे. आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या निर्देशानुसार तसेच अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, तृप्ती सांडभोर आणि विक्रांत बगाडे यांच्या मार्गदर्शनाखाली ही व्यवस्था करण्यात आली आहे.**




महापालिकेच्या वैद्यकीय विभागाकडून विसर्जनस्थळी वैद्यकीय पथके आणि रुग्णवाहिका सज्ज ठेवण्यात आल्या आहेत. आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांना तातडीने उपचार मिळावेत तसेच गरज भासल्यास रुग्णालयात हलविता यावे, यासाठी वैद्यकीय अधिकारी, स्टाफ नर्स, वॉर्डबॉय आणि रुग्णवाहिका चालकांचा समावेश असलेली पथके तैनात करण्यात आली आहेत.

विसर्जनाच्या पार्श्वभूमीवर अग्निशमन विभागानेही विशेष बंदोबस्त ठेवला आहे. प्रशिक्षित अग्निशमन जवानांसह आवश्यक अग्निशमन वाहने विसर्जनस्थळी सज्ज ठेवण्यात आली आहेत. पाण्यातील दुर्घटना टाळण्यासाठी जीवरक्षक आणि आपदा मित्रांचीही नियुक्ती करण्यात आली आहे.

'अ' क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीत स्पाईन रोड, यमुनानगर, मोहननगर सांस्कृतिक भवन, गणेश तलावाजवळ सेक्टर २६ प्राधिकरण आणि नियोजित महापौर निवास मैदान, सेक्टर २७ प्राधिकरण येथे कृत्रिम हौदांची व्यवस्था करण्यात आली आहे. याशिवाय ठाकरे मैदान, विठ्ठल मंदिर आकुर्डी, सेंट उर्सुला शाळेजवळ, दुर्गे चौक काळभोरनगर आणि कै. पांडुरंग उर्फ काकाभाऊ सभागृह आदी ठिकाणी मूर्ती संकलन केंद्रे तयार करण्यात आली आहेत.

गणेशमूर्ती विसर्जनासोबत निर्माल्य व्यवस्थापनासाठीही महापालिकेने स्वतंत्र व्यवस्था केली आहे. २३ सप्टेंबरपर्यंत शहरातून २२ हजार ६४७.२५ किलो निर्माल्य संकलित करण्यात आले आहे. नागरिकांनी फुले, हार, दुर्वा आणि अन्य पूजासाहित्य नदी, तलाव किंवा जलस्रोतांमध्ये न टाकता महापालिकेच्या निर्माल्य संकलन केंद्रांवर जमा करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

अनंत चतुर्दशीच्या दिवशी मोठ्या संख्येने नागरिक विसर्जनासाठी बाहेर पडणार असल्याने नागरिकांनी सुरक्षित विसर्जनस्थळांचा वापर करावा. तसेच महापालिकेच्या सूचनांचे पालन करून वैद्यकीय पथके, अग्निशमन जवान आणि जीवरक्षकांना सहकार्य करावे, असे आवाहन महापालिका प्रशासनाने केले आहे.

### ४९ हजार ८०३ मूर्तींचे संकलन-विसर्जन!

१४ ते २३ सप्टेंबरदरम्यान शहरात आतापर्यंत ४९ हजार ८०३ गणेशमूर्तींचे संकलन अथवा विसर्जन झाले आहे. यामध्ये १० हजार १७० पर्यावरणपूरक मूर्ती आणि ३९ हजार ६३३ पीओपी मूर्तींचा समावेश आहे.

### ४१ कृत्रिम तलावांची व्यवस्था

महापालिकेच्या उपलब्ध नोंदीनुसार 'अ' क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीत १०, 'ड' क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीत ११ आणि 'फ' क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीत २०, असे एकूण ४१ कृत्रिम तलाव तयार करण्यात आले आहेत. तसेच विविध ठिकाणी गणेशमूर्ती संकलन केंद्रे उभारण्यात आली आहेत.

# अनंत चतुर्दशीनिमित्त मेट्रोच्या स्थानकांवरील प्रवेश-निर्गमन व्यवस्थेत बदल!

» पिंपरी | प्रतिनिधी

**अनंत चतुर्दशी आणि गणेश विसर्जन मिरवणुकांच्या पार्श्वभूमीवर पुणे मेट्रोने प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी विशेष नियोजन केले आहे. २५ सप्टेंबर रोजी पीसीएमसी, डेक्कन जिमखाना, छत्रपती संभाजी उद्यान, एसएनडीटी, गरवारे कॉलेज आणि पीएमसी या स्थानकांवरील काही गेट केवळ प्रवेशासाठी, तर काही गेट निर्गमनासाठी राखीव ठेवण्यात आले आहेत. प्रवाशांनी स्थानकांवरील सूचनांचे पालन करून संबंधित गेटचा वापर करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.**



दरम्यान, गणेश विसर्जनाच्या पार्श्वभूमीवर पुणे मेट्रोची सेवा सलग ४१ तास सुरू राहणार असून, विसर्जन मिरवणुका, भाविकांची गर्दी आणि प्रवाशांची वाढती संख्या लक्षात घेऊन मेट्रो प्रशासनाने विशेष नियोजन केले आहे. गणेश विसर्जनासाठी शहराच्या विविध भागांतून नागरिक मोठ्या संख्येने बाहेर पडणार असल्याने मेट्रो स्थानकांवर गर्दी नियंत्रण आणि प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक उपाययोजना करण्यात आल्या आहेत. महात्मा फुले मंडई मेट्रो स्थानकात गणेशोत्सवाच्या सुरुवातीपासूनच मोठ्या प्रमाणात गर्दी होत असल्याने येथे बॅरिकेडिंग करण्यात आले आहे.

बॅरिकेडिंग हटेपर्यंत या स्थानकावर प्रवाशांची ये-जा, प्रवेश-निर्गमन आणि गर्दीचे व्यवस्थापन विशेष पद्धतीने करण्यात येणार आहे. तसेच काही महत्त्वाच्या स्थानकांवरील प्रवेश आणि निर्गमन व्यवस्थेत करण्यात आलेले तात्पुरते बदल २५ सप्टेंबरपर्यंतच लागू राहणार आहेत. २६ सप्टेंबरपासून संबंधित सर्व स्थानकांवरील प्रवेश-निर्गमन व्यवस्था पूर्ववत करण्यात येणार आहे. त्यामुळे नागरिकांनी गर्दीचा विचार करून प्रवासाचे नियोजन करावे, स्थानकांवरील सूचना आणि सुरक्षा व्यवस्थेचे पालन करावे तसेच मेट्रो प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# महापालिकेलाच टँकरचा आधार; पालिका भवनात पाणीटंचाई!

## सकाळपासून पाणीपुरवठा ठप्प; अधिकारी-कर्मचाऱ्यांसह नागरिकांची गैरसोय!

**» पिंपरी | प्रतिनिधी**

**शहराला पाणीपुरवठा करणारे पवना धरण १०० टक्के भरलेले असतानाही पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीलाच टँकरने पाणीपुरवठा करण्याची वेळ आल्याने प्रशासनाच्या पाणीपुरवठा नियोजनावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. गुरुवारी सकाळपासून महापालिका भवनातील पाणीपुरवठा खंडित झाल्याने अधिकारी, कर्मचारी तसेच विविध कामांसाठी आलेल्या नागरिकांची मोठी गैरसोय झाली. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी प्रशासनाला तातडीने तीन खासगी टँकर मागवून पाणीपुरवठा करावा लागला.**



मिळालेल्या माहितीनुसार, गुरुवारी सकाळपासून महापालिका भवनात पाणी उपलब्ध नसल्याने दैनंदिन कामकाजावरही त्याचा परिणाम झाला. महापालिका भवनासारख्या शहरातील प्रमुख प्रशासकीय इमारतीतच पाणीपुरवठा खंडित झाल्याने प्रशासनाची मोठी धावपळ उडाली. अखेर पाण्याची गरज भागविण्यासाठी तीन खासगी टँकरद्वारे पाणी आणण्यात आले.

विशेष म्हणजे, शहरातील अनेक भागांतून नागरिकांकडून अनियमित आणि अपुऱ्या पाणीपुरवठ्याच्या तक्रारी सातत्याने केल्या जात आहेत. त्यात आता महापालिकेच्या मुख्य इमारतीलाच टँकरच्या पाण्यावर अवलंबून राहण्याची वेळ आल्याने पाणीपुरवठा विभागाच्या नियोजनावर प्रश्न उपस्थित होत आहेत. पालिका भवनातील पाणीपुरवठा नेमका कोणत्या कारणामुळे बंद झाला, याबाबत पाणीपुरवठा विभागाकडून स्पष्ट माहिती समोर आलेली नाही.

शहराला पाणीपुरवठा करणारे पवना धरण पूर्ण क्षमतेने भरलेले असतानाही पाणीपुरवठ्याच्या तक्रारी कायम आहेत. अशा परिस्थितीत महापालिका भवनातच पाण्याची टंचाई निर्माण होऊन खासगी टँकर मागवावा लागल्याने नागरिकांकडून आश्चर्य व्यक्त होत आहे. पाणीपुरवठा खंडित होण्यामागील नेमके कारण काय, याची चौकशी करून भविष्यात अशा प्रकारची परिस्थिती निर्माण होऊ नये, यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची मागणी होत आहे.

# वायसीएममध्ये ध्वनीप्रदूषणाविरोधात कारवाईची मागणी; ॲड. सागर चरण यांचे आयुक्तांना निवेदन

**» पिंपरी | प्रतिनिधी**

**पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वायसीएम रुग्णालय परिसरात रुग्णांना शांत, सुरक्षित व आरोग्यदायी उपचारपरिसर उपलब्ध करून देणे तसेच रुग्णांसाठी असलेल्या 'साईड रूम'चा अधिकृत व योग्य वापर सुनिश्चित करणे, या मागणीसाठी जिल्हा दक्षता समितीचे मा. सदस्य ॲड. सागर चरण यांनी महापालिका आयुक्तांकडे तातडीने तक्रार व निवेदन सादर केले आहे.**




गणेश विसर्जनाच्या दिवशी वायसीएम रुग्णालय परिसरात मोठ्या आवाजात ढोल-ताशांचा वापर झाल्याने रुग्णालयातील रुग्णांच्या शांतता, सुरक्षितता, विश्रांती तसेच आरोग्यदायी उपचारपरिसरावर प्रतिकूल परिणाम होण्याची परिस्थिती निर्माण झाल्याचे निदर्शनास आले. रुग्णालय हे उपचारासाठी अत्यंत संवेदनशील आणि महत्त्वाचे ठिकाण असल्याने अशा प्रकारच्या मोठ्या आवाजातील ध्वनीप्रदूषणामुळे रुग्णांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता निर्माण होते. त्यामुळे रुग्णांच्या मूलभूत आरोग्यहिताचे संरक्षण, त्यांना आवश्यक शांततामय वातावरण उपलब्ध करून देणे आणि उपचार प्रक्रियेत कोणताही अडथळा निर्माण होऊ न देणे, याबाबत गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत.

या संपूर्ण बाबीची तातडीने दखल घेऊन संबंधित घटनेची सखोल चौकशी करण्यात यावी, तसेच रुग्णालय परिसरात मोठ्या आवाजात ढोल-ताशांचा वापर करून ध्वनीप्रदूषणास कारणीभूत ठरलेल्या व्यक्ती अथवा आयोजकांची जबाबदारी निश्चित करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. चौकशीमध्ये संबंधित व्यक्ती अथवा आयोजक दोषी आढळल्यास त्यांच्याविरुद्ध लागू कायदे व नियमांनुसार आवश्यक प्रशासकीय तसेच कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

### रुग्णालय परिसरात ध्वनीप्रदूषणाला आळा घालण्याची मागणी!

वायसीएम रुग्णालय परिसरात गणेश विसर्जनाच्या वेळी मोठ्या आवाजात ढोल-ताशांचा वापर झाल्याच्या पार्श्वभूमीवर ध्वनीप्रदूषणाची तातडीने दखल घेण्याची मागणी करण्यात आली आहे. रुग्णालय हे संवेदनशील ठिकाण असल्याने रुग्णांची शांतता, विश्रांती आणि उपचार प्रक्रियेत कोणताही अडथळा निर्माण होऊ नये, यासाठी संबंधित यंत्रणांनी कठोर उपाययोजना कराव्यात. ध्वनीप्रदूषणास तसेच 'साईड रूम'च्या अनधिकृत वापरास जबाबदार व्यक्तींची चौकशी करून दोषी आढळल्यास कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी ॲड. सागर चरण यांनी केली आहे.

निवेदनात ध्वनी प्रदूषण (नियमन व नियंत्रण) नियम, २००० मधील नियम ३(१), ३(३), ३(५), नियम ४(१)-(२) तसेच नियम ५(१) मधील विविध तरतुदींचा संदर्भ देण्यात आला आहे. या नियमांनुसार निर्धारित करण्यात आलेल्या ध्वनी मर्यादांचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे. तसेच ध्वनीप्रदूषण नियंत्रणासाठी आवश्यक त्या उपाययोजना करणे आणि ध्वनिक्षेपक अथवा सार्वजनिक उद्घोषणा यंत्रणेचा वापर करण्यापूर्वी सक्षम प्राधिकाऱ्याची आवश्यक परवानगी घेणे अपेक्षित आहे. नियमांनुसार अधिसूचित केल्यास रुग्णालय परिसर 'शांतता क्षेत्र' म्हणून लागू होऊ शकतो. त्यामुळे अशा संवेदनशील परिसरात ध्वनीप्रदूषण होणार नाही, यासाठी संबंधित यंत्रणांनी आवश्यक ती खबरदारी घेणे गरजेचे असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

तसेच, रुग्णांच्या अधिकारांच्या सनदेत रुग्णांची प्रतिष्ठा, गोपनीयता, शांततामय वातावरण आणि आरोग्यदायी उपचारपरिसर यांचे संरक्षण करण्यावर विशेष भर देण्यात आला आहे. रुग्णालयात उपचार घेत असलेल्या रुग्णांना विश्रांतीसाठी तसेच उपचारासाठी आवश्यक असलेले शांत आणि सुरक्षित वातावरण मिळणे हा महत्त्वाचा मुद्दा आहे. त्यामुळे रुग्णांच्या आरोग्यावर प्रतिकूल परिणाम करणाऱ्या अनधिकृत ध्वनीप्रदूषणास तसेच 'साईड रूम'च्या अनधिकृत वापरास जबाबदार असलेल्या व्यक्तींची सखोल चौकशी करण्यात यावी. चौकशीत दोषी आढळणाऱ्यांविरुद्ध संबंधित कायदे व नियमांनुसार प्रशासकीय तसेच आवश्यक ती कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

# 100 सीसीटीव्हींच्या जाळ्यात चैन स्नॅचर अडकले; तिघे जेरबंद!

## १० दिवसांच्या तपासानंतर गुन्हे शाखा युनिट-३ची कारवाई; मंगळसूत्रासह चोरीची दुचाकी जप्त!

**» पुणे | प्रतिनिधी**

**सुमारे १०० सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज तपासत तब्बल दहा दिवस केलेल्या पाठपुराव्यानंतर पिंपरी-चिंचवड गुन्हे शाखा युनिट-३ने चैन स्नॅचिंग आणि दुचाकी चोरीचे दोन गुन्हे उघडकीस आणले. या कारवाईत तीन संशयितांना ताब्यात घेण्यात आले असून, त्यांच्याकडून सोन्याचे मंगळसूत्र आणि चोरीची होंडा युनिकॉर्न दुचाकी जप्त करण्यात आली आहे.**




पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांच्या सूचनेनुसार एमआयडीसी भोसरी पोलीस ठाण्यात दाखल चैन स्नॅचिंगच्या गुन्ह्याचा समांतर तपास गुन्हे शाखा युनिट-३कडून सुरू होता. तपासादरम्यान पोलिसांनी विविध भागांतील सुमारे १०० सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज तपासून संशयितांचा माग काढला.

दरम्यान, २३ सप्टेंबर रोजी गुन्हे शाखेला संशयित मोशीतील आदर्शनगर परिसरात फिरत असल्याची गोपनीय माहिती मिळाली. त्यानुसार संघर्ष कॉलनी, आदर्शनगर येथे सापळा रचून इंदर अनिल राजपूत (२२), महेश कान्हा राजपूत (२६) आणि एका विधीसंघर्षित बालकाला ताब्यात घेण्यात आले.

चौकशीत त्यांनी मोशी सेक्टर-४, प्राधिकरण परिसरात एका महिलेच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र हिसकावल्याची तसेच पुरंदर तालुक्यातील कोळविहरे येथून होंडा युनिकॉर्न दुचाकी चोरी केल्याची माहिती पोलिसांना दिली. त्यांच्याकडून सोन्याचे मंगळसूत्र आणि चोरीची दुचाकी जप्त करण्यात आली.

या कारवाईमुळे एमआयडीसी भोसरी पोलीस ठाण्यातील चैन स्नॅचिंगचा तसेच जेजुरी पोलीस ठाण्यातील दुचाकी चोरीचा गुन्हा उघडकीस आला आहे. अटक आरोपींवर यापूर्वी दिघी, एमआयडीसी भोसरी, चाकण आणि वाकड पोलीस ठाण्यांत विविध गुन्हे दाखल असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

ही कारवाई वरिष्ठ पोलीस निरीक्षक संतोष कसबे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक सुनील जावळे, पोलीस उपनिरीक्षक भरत गोसावी आणि गुन्हे शाखेच्या पथकातील कर्मचाऱ्यांनी केली.

### १० दिवसांच्या तपासानंतर मोठे यश

सुमारे १०० सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज बारकाईने तपासत आणि तब्बल १० दिवस सातत्याने पाठपुरावा करत गुन्हे शाखा युनिट-३च्या पथकाने चैन स्नॅचिंग तसेच दुचाकी चोरीच्या गुन्ह्यांचा छडा लावला. पोलिसांनी सापळा रचून तिघांना ताब्यात घेतल्यानंतर त्यांची कसून चौकशी केली असता, त्यांनी मोशी परिसरात महिलेचे सोन्याचे मंगळसूत्र हिसकावल्याची तसेच पुरंदर तालुक्यातील कोळविहिरे येथून दुचाकी चोरी केल्याची कबुली दिली. त्यानंतर पोलिसांनी आरोपींकडून चोरीचे सोन्याचे मंगळसूत्र आणि होंडा युनिकॉर्न दुचाकी हस्तगत केली. या कारवाईमुळे एमआयडीसी भोसरी पोलीस ठाण्यातील चैन स्नॅचिंगचा आणि जेजुरी पोलीस ठाण्यातील दुचाकी चोरीचा गुन्हा उघडकीस आला.

# नियमभंग करणाऱ्यांना ट्रॅफिक पोलिसांचा दणका; ५.७२ लाख वाहनांवर कारवाई!

**» पुणे | प्रतिनिधी**

**पिंपरी-चिंचवड शहरातील वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांविरोधात वाहतूक पोलिसांनी विशेष मोहीम राबवत मोठ्या प्रमाणात कारवाई केली आहे. शहरातील विविध भागांत नियमभंग करणाऱ्या वाहनांची तपासणी करून काळी फिल्म लावलेली वाहने, फॅन्सी व अनधिकृत नंबर प्लेट, HSRP नंबर प्लेट नसलेली वाहने तसेच मॉडिफाइड सायलेंसरचा वापर करून मोठ्या आवाजात वाहन चालविणाऱ्यांवर पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला आहे. वाहतुकीला शिस्त लावण्यासोबतच रस्ते सुरक्षेला प्राधान्य देत ही मोहीम सातत्याने राबविण्यात येत आहे. २२ सप्टेंबरपर्यंत राबविण्यात आलेल्या या विशेष मोहिमेत तब्बल ५ लाख ७२ हजार १८ वाहनांवर कारवाई करण्यात आली असून, या कारवाईतून तब्बल ६३ कोटी ७८ लाख ४७ हजार ६५० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे.**





वाहतूक पोलिसांच्या कारवाईच्या आकडेवारीवरून शहरात विविध प्रकारे वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांची संख्या मोठी असल्याचे स्पष्ट झाले आहे. विनाहेल्मेट वाहन चालविणाऱ्या तब्बल ७२ हजार १२३ वाहनचालकांवर पोलिसांनी कारवाई केली आहे. त्याचबरोबर वाहनांवर फॅन्सी किंवा अनधिकृत नंबर प्लेट वापरणाऱ्या ५३ हजार ८४० वाहनांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. वाहनांच्या काचांना नियमबाह्य काळी फिल्म लावणाऱ्या २७ हजार ५९७ वाहनचालकांनाही कारवाईला सामोरे जावे लागले आहे. याशिवाय मॉडिफाइड सायलेंसर बसवून वाहनांचा मोठा आवाज करत ध्वनीप्रदूषण करणाऱ्या १० हजार २०३ वाहनांवरही वाहतूक पोलिसांनी कारवाई केली आहे.

शहरातील वाढती वाहनसंख्या, वाहतुकीची वाढती गर्दी आणि नियमांचे उल्लंघन यामुळे रस्ते सुरक्षेचा प्रश्न निर्माण होत आहे. अनेक वाहनचालकांकडून हेल्मेटचा वापर टाळणे, वाहनांवर नियमबाह्य नंबर प्लेट लावणे, काचांना काळी फिल्म लावणे किंवा वाहनांमध्ये परवानगी नसलेले बदल करणे असे प्रकार केले जातात. अशा नियमभंगामुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होण्यासोबतच अपघातांचा धोका वाढू शकतो. त्यामुळे वाहतूक पोलिसांकडून शहरातील विविध प्रमुख रस्ते, चौक आणि गर्दीच्या ठिकाणी तपासणी वाढविण्यात आली आहे.

विशेष मोहिमेदरम्यान नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांवर दंडात्मक कारवाई करत त्यांना वाहतूक नियमांचे पालन करण्याच्या सूचना देण्यात येत आहेत. विशेषतः दुचाकीस्वारांनी हेल्मेटचा वापर करणे, वाहनांवर अधिकृत नंबर प्लेट लावणे आणि वाहनांची कागदपत्रे नियमांनुसार ठेवणे आवश्यक असल्याचे पोलिसांकडून स्पष्ट करण्यात आले आहे. तसेच वाहनांच्या काचांना नियमबाह्य काळी फिल्म लावणे आणि मोठ्या आवाजाचे मॉडिफाइड सायलेंसर वापरणे टाळण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर भविष्यातही अशाच प्रकारे कठोर कारवाई सुरू राहणार असल्याचा इशारा वाहतूक पोलिसांनी दिला आहे. नागरिकांनी वाहतूक नियमांचे पालन करून स्वतःची तसेच इतरांची सुरक्षितता सुनिश्चित करावी, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे. नियमांचे पालन केल्यास वाहतुकीतील शिस्त वाढण्यासोबतच अपघातांचे प्रमाण कमी करण्यासही मदत होणार असल्याने वाहनचालकांनी दंडाची कारवाई होण्यापूर्वीच नियमांचे पालन करण्यावर भर द्यावा, असे पोलिसांनी सांगितले आहे.

### ६३ कोटींचा दंड; नियमभंगाला बसला चाप

पिंपरी-चिंचवड वाहतूक पोलिसांच्या विशेष मोहिमेत २२ सप्टेंबरपर्यंत तब्बल ५ लाख ७२ हजार १८ वाहनांवर कारवाई करण्यात आली. या कारवाईतून ६३ कोटी ७८ लाख ४७ हजार ६५० रुपयांचा दंड वसूल झाला. विनाहेल्मेट वाहनचालक, फॅन्सी नंबर प्लेट, काळी फिल्म आणि मॉडिफाइड सायलेंसर वापरणाऱ्यांवर मोठ्या प्रमाणात कारवाई करण्यात आली असून, वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर पोलिसांची नजर कायम राहणार आहे.

# बाप्पाच्या विसर्जनाला दारूला 'नो एंट्री'!

## पुण्यात ड्राय डे; उत्पादन शुल्क विभागाची विशेष पथके तैनात

**» पुणे | प्रतिनिधी**

**पुण्यात गणेश विसर्जन मिरवणुकीच्या पार्श्वभूमीवर शुक्रवारी (२५ सप्टेंबर) संपूर्ण शहरात मद्यविक्री बंद ठेवण्यात आली आहे. अनंत चतुर्दशीच्या दिवशी 'ड्राय डे' जाहीर करण्यात आला असून, विसर्जन मिरवणुकीदरम्यान मद्याची अवैध विक्री, साठवणूक तसेच वाहतूक होऊ नये, यासाठी राज्य उत्पादन शुल्क विभागाने विशेष नियोजन केले आहे. मद्यविक्रीवर लक्ष ठेवण्यासाठी विभागाची विशेष पथके शहरात तैनात करण्यात आली असून, मध्यवर्ती पुण्यासह विसर्जन मिरवणुकीच्या प्रमुख मार्गांवर या पथकांकडून कडक नजर ठेवण्यात येणार आहे. संशयास्पद हालचाली आढळल्यास तत्काळ तपासणी करून संबंधितांवर कारवाई केली जाणार आहे.**




गणेशोत्सवाच्या सुरुवातीला गणेश चतुर्थीच्या दिवशी म्हणजेच १४ सप्टेंबर रोजीही पुणे शहरात मद्यविक्री बंद ठेवण्यात आली होती. त्यानंतर आता अनंत चतुर्दशीच्या दिवशी दुसरा ड्राय डे पाळला जात आहे. गणेश विसर्जनाच्या दिवशी मध्यवर्ती पुण्यात मोठ्या प्रमाणात गणेशभक्त आणि नागरिकांची गर्दी होण्याची शक्यता आहे. विविध मंडळांच्या विसर्जन मिरवणुका शहरातील प्रमुख रस्त्यांवरून मार्गस्थ होणार असल्याने गर्दीचा फायदा घेऊन मद्याची अवैध विक्री किंवा वाहतूक होऊ नये, यासाठी उत्पादन शुल्क विभागाने विशेष खबरदारी घेतली आहे.

### विसर्जन मार्गांवर उत्पादन शुल्कची करडी नजर

अनंत चतुर्दशीच्या पार्श्वभूमीवर पुण्यात मद्यविक्री बंद ठेवण्यात आली असून, अवैध मद्यविक्री आणि वाहतुकीवर लक्ष ठेवण्यासाठी राज्य उत्पादन शुल्क विभागाची विशेष पथके तैनात करण्यात आली आहेत. मंडई, लक्ष्मी रस्ता, टिळक रस्ता, बाजीराव रस्ता आणि प्रमुख विसर्जन मार्गांवर तपासणी केली जाणार आहे. ड्राय डेच्या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांवर कडक कारवाई करण्यात येणार आहे.

मंडई, लक्ष्मी रस्ता, टिळक रस्ता, बाजीराव रस्ता तसेच विसर्जन मिरवणुकीच्या इतर प्रमुख मार्गांवर विशेष पथकांकडून पाहणी केली जाणार आहे. मद्यविक्रीची दुकाने, संशयास्पद ठिकाणे, गर्दीची ठिकाणे तसेच मिरवणूक मार्गालगतच्या परिसरावर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. ड्राय डेच्या दिवशी नियमांचे उल्लंघन करून मद्यविक्री करणाऱ्या व्यावसायिकांवर तसेच अवैधरीत्या मद्याची वाहतूक किंवा विक्री करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई केली जाणार आहे.

पुणे अधीक्षक अतुल कानडे यांच्या मार्गदर्शनाखाली उत्पादन शुल्क विभागाची पथके काम करणार असून, विसर्जन मिरवणूक शांततेत आणि सुरळीत पार पडावी यासाठी विभागाकडून आवश्यक ती खबरदारी घेतली जात आहे. ड्राय डेच्या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांवर कोणतीही कुचराई न करता कारवाई करण्यात येणार असल्याचे विभागाकडून स्पष्ट करण्यात आले आहे. त्यामुळे अनंत चतुर्दशीच्या दिवशी शहरात मद्यविक्रीवर उत्पादन शुल्क विभागाची करडी नजर राहणार असून, नियमभंग करणाऱ्यांवर कारवाईचा बडगा उगारला जाणार आहे.

# 'बाप्पा, आमच्या दादाला परत पाठवा!'; बॅनरने पुणेकरांचे लक्ष वेधले

**» पुणे | प्रतिनिधी**

**पुण्यात गणेश विसर्जनाची लगबग सुरू असतानाच एका भावनिक बॅनरने नागरिकांचे लक्ष वेधून घेतले आहे. 'गणेश मित्र मंडळ'च्या वतीने लावण्यात आलेल्या या बॅनरवर, 'एवढाच निरोप सांगा बाप्पाला, परत पाठवा आमच्या दादाला!' असा भावनिक मजकूर लिहिण्यात आला आहे. बाप्पाला निरोप देतानाच अजित पवार यांच्या आठवणींना उजाळा देणारा हा संदेश सध्या परिसरात चर्चेचा विषय ठरत आहे.**




अजित पवार यांचे २८ जानेवारी २०२६ रोजी बारामती येथे झालेल्या विमान अपघातात निधन झाले. मुंबई-बारामती मार्गावर प्रवास करणारे लिअरजेट ४५ विमान बारामती येथे अपघातग्रस्त झाले होते. या विमानात दोन क्रूसह पाच जण होते आणि सर्वांचा मृत्यू झाला, अशी माहिती नागरी उड्डाण मंत्रालयाने दिली होती.

अजित पवार यांच्या निधनानंतर त्यांच्या समर्थक आणि कार्यकर्त्यांमध्ये शोकाचे वातावरण निर्माण झाले होते. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर लावण्यात आलेल्या या बॅनरमधून त्यांच्या आठवणींना पुन्हा उजाळा देण्यात आला आहे. 'एवढाच निरोप सांगा बाप्पाला' या शब्दांत बाप्पाला निरोप देतानाची भावना व्यक्त करण्यात आली आहे, तर 'परत पाठवा आमच्या दादाला' या ओळीत अजित पवार यांच्याबद्दलचा भावनिक जिव्हाळा व्यक्त करण्यात आला आहे.

पुण्याचा गणेशोत्सव हा केवळ धार्मिक उत्सव न राहता सामाजिक आणि सांस्कृतिक परंपरेचाही महत्त्वाचा भाग बनला आहे. गणेश विसर्जनाच्या दिवशी शहरातील प्रमुख रस्त्यांवर मोठी गर्दी होते. ढोल-ताशांचा गजर, लेझीम, पारंपरिक वाद्ये आणि 'गणपती बाप्पा मोरया'च्या जयघोषात गणेशमूर्तींना निरोप दिला जातो. अशा भावनिक वातावरणात सामाजिक, सांस्कृतिक आणि वैयक्तिक भावनांना व्यक्त करणारे बॅनर नागरिकांचे लक्ष वेधून घेतात.

गणेश मित्र मंडळाच्या या बॅनरमधूनही याच भावनेचे दर्शन घडत आहे. बाप्पाला निरोप देताना अजितदादांच्या आठवणींचा उल्लेख करण्यात आल्याने या बॅनरची चर्चा होत आहे. विसर्जन मिरवणुकीच्या मार्गावरून जाणाऱ्या नागरिकांचे लक्ष या संदेशाकडे जात असून, बॅनरचे फोटो आणि व्हिडिओही सोशल मीडियावर शेअर केले जात आहेत.

गणेशोत्सवाच्या सांगतेच्या पार्श्वभूमीवर लावण्यात आलेला हा भावनिक संदेश अजित पवार यांच्या समर्थकांच्या आठवणी आणि भावना व्यक्त करणारा ठरत आहे. बाप्पाला निरोप देताना 'पुढच्या वर्षी लवकर या' अशी प्रार्थना केली जाते; त्याच भावनेतून 'आमच्या दादाला परत पाठवा' असा संदेश देणाऱ्या या बॅनरने पुण्यातील विसर्जन मिरवणुकीत वेगळेच लक्ष वेधून घेतले आहे.